सकाळ परभणी TODAY
शनिवार २६ नोव्हेंबर २०१६
कमाल 30.0°C / किमान 11.5°C

# नूतन महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता सांभाळली

## उद्‌घाटन प्रसंगी डॉ. मोहन खताळ यांचे प्रतिपादन

**सेलू, ता. २५ (बातमीदार)** : स्वच्छता हे एक मूल्य असून नूतन महाविद्यालयाने ते आजपर्यंत सांभाळले आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत शैक्षणिक गुणवत्ता सांभाळत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडण घडणीसाठी विविध अभ्यासपूरक उपक्रमांचे आयोजन केले आहे, असे प्रतिपादन नांदेड विभागाचे सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी महिला वसतिगृह आणि विद्यार्थिनींसाठी घेण्यात आलेल्या व्हेंडिंग मशिनच्या उद्‌घाटन प्रसंगी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी होते. व्यासपीठावर डॉ. एस. एन. कबाडी, डॉ. एम. बी. स्वामी, डॉ. एन. टी. भागवत, डॉ. एस. व्ही. नरवाडे यांची उपस्थिती होती. खताळ म्हणाले, ग्रामीण भागात काम करीत असलेल्या नूतन महाविद्यालयाने अनेक चांगल्या शैक्षणिक परंपरा निर्माण केल्या असून संस्थाचालक आणि महाविद्यालयाच्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटित प्रयत्नांचा हा परिपाक आहे. या प्रसंगी खताळ यांनी महाविद्यालय परिसर, वर्ग खोल्या, ग्रंथालय, कार्यालय, महाविद्यालयातील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली.

उपप्राचार्य प्रा. यादव गायकवाड यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन प्रा. प्रवीण खरात यांनी केले. आभार प्रा. आर. आर. बैनवाड यांनी मानले.